


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २६ डिसेंबर २०२४ | अंक १७० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

## विहिरीत पडून शेतकऱ्याचा मृत्यू


आष्टी तालुक्यातील वाहिरा येथील शेतकरी नवनाथ झांजे यांचा विहिरीत पाय घसरून पडल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अधिक माहिती अशी की, दि २२ रोजी वाहिरा येथील नवनाथ झांजे हे नेहमी प्रमाणे गुरे चारण्यासाठी शेतात गेले होते.दुपारी दोन च्या सुमारास गुरे पाणी पाजण्यासाठी ते शेतातील विहिरीवर पाणी शेंदत असताना अचानक पाय घसरल्याने ते विहिरीत पडले.त्यावेळी तिथे आसपास कोणीच नसल्याने पाण्यात बुडून त्यांचा मृत्यु झाला.माहिती मिळताच घटनास्थळी अंभोरा पोलिस ठाण्याचे बीट अंमलदार सुदाम पोकळे, पडवळ , व तांदळे यांनी धाव घेतली.रात्री बारा वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला.त्यानंतर शवविच्छेदन करण्यासाठी कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा एक मुलगी असा परिवार आहे.अशी दुर्दैवी घटना घडल्यामुळे झांजे कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे

## न्युरोसर्जन डॉ. समीर शेख यांना मातृशोक

**बीड दि.२५ ( प्रतिनिधी) शहरातील काकू नाना हॉस्पिटल मधील प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. समीर शेख यांच्या आईचे बुधवारी दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी निधन झाले आहे. उद्या गुरुवार दि. २६ डिसेंबर रोजी पहाटे ७ वाजता ( फजरच्या नमाज नंतर) नर्सरी रोडवरील तकिया मस्जिद परिसरातील कब्रस्तानमध्ये त्यांचा दफनविधी करण्यात येणार आहे.**

**बीड येथील काकू नाना हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. याच दरम्यान बुधवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास त्यांना हृदयविकाराचा धक्का बसल्याने त्यांची प्राणज्योत मालवली.डॉ.शेख कुटुंबियांच्या दुःखात दैनिक किसान परिवार सहभागी आहे.**

## सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी नागरगोजे यांचे आज अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतन



बीड, दि. २४ (प्रतिनिधी) : केज तालुक्यातील देवगांव येथील रहिवाशी व निवृत्त गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय नागरगोजे यांच्या अमृतमहोत्सवा निमीत्त बुधवारी (दि. २५) त्यांचा अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी पाच वाजता सुर्या लॉन्स येथे हा कार्यक्रम होईल. शिस्तप्रिय आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक अशी ओळख असलेले दत्तात्रय नागरगोजे यांनी वयाच्या २२ व्या वर्षी अध्यापन सेवेला सुरुवात केली. त्यांनी दहिफळ वडमाऊली, विडा, वाघेबाभळगाव, येवता, भांटूबायेथे सह शिक्षक व मुख्याध्यापक या पदावर काम केले. तसेच गंगाखेड येथे त्यांनी गटशिक्षणाधिकारी म्हणूनही सेवा बजावली. गणित विषयाचे अध्यापन करताना त्यांनी विद्यार्थर्यांना वैयक्तीक आयुष्यातही मदतीचा हात दिला. शिस्तप्रिय परंतु मृदु स्वभावाचे व तत्वनिष्ठ अशी त्यांची ओळख आहे. त्यांनी शेतीतही अनेक यशस्वी प्रयोग केले आहेत. त्यांच्या अमृत महोत्सवा निमित्त त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

# बीड नव्हे, मुख्यमंत्री फडणवीस यांना हवंय या जिल्ह्याचं पालकमंत्रीपद

विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर ब-याच दिवसांनी महायुतीतील मंत्रीमंडळाचा शपथविधी पार पडला. त्यानंतरही खातेवाटप होण्यासाही काही दिवस लागले. अखेर आता खातेवाटप पार पडलं असलं तरी पालकमंत्रीपदावरून सत्ताधारी नेत्यांमध्ये रस्सीखेच सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पालकमंत्रीपदावरून एक महत्वाचं विधान केलं आहे. आपल्याला कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्री पद हवं हे फडणवीसांनी स्पष्ट्च सांगितलं. नागपूरमध्ये माध्यमांशी संवाद साधताना ते या विषयावर स्पष्ट्च बोलले. पालकमंत्र्याबाबत चंद्रशेखर बावनकुळे आणि दोन उपमुख्यमंत्री ठरवतील. मला बीडला पाठवलं तर मी जाईल. खरंतर मुख्यमंत्री कोणत्याही जिल्ह्याचं पालकत्व घेत नसतात. पण गडचिरोलीचं पालकमंत्रीपद घ्यावं अशी माझी इच्छा आहे. अर्थात दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी परवानगी दिली तरच घेईनफ असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यातील केज



तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. यामध्ये धनंजय मुंडे यांचा खास माणूस असलेल्या वाल्मिकी कराडचे नाव प्रमुख आरोपी म्हणून घेतले जात आहे. या घटनेला अनेक दिवस उलटून गेले तरीही अद्याप तीन आरोपींना अटक झाली नसून त्यामुळे राज्यातील वातावरण चांगलंच तापलं आहे. विरोधकांनी सरकारला चहूबाजूने घेरत धारेवर धरलं आहे. गेल्यावेळी धनंजय मुंडे हे बीडचे पालकमंत्री होते. यावेळीही त्यांनाच पालकमंत्रिपद मिळणार का याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. मात्र बीडमधील सरपंचांच्या हत्येच्या घटनेमुळे राज्यभरात आक्रोश असून धनंजय मुंडे यांना पुन्हा बीडचं पालकमंत्रीपद देऊ नये , ते (पालकमंत्रीपद) मुख्यमंत्री फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घ्यावं अशी मागणी होत आहे. याच पार्श्वभूमीवर आता बीडचे नवे पालकमंत्री कोण याची जोरदार चर्चा सुरू आहे.याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारलं असता, बीडचं पालकमंत्री पद कोणाला द्यायचं यासंदर्भात मी अजितदादा आणि एकनाथ शिंदे मिळून ठरवू असं फडणवीस यांनी कालच म्हटलं होतं. तर आज त्यांना पुन्हा याबद्दल सवाल विचारण्यात आला असता फडणवीसांनी यावर पुन्हा भूमिका स्पष्ट केली. पालकमंत्री पदाचा निर्णय चंद्रशेखर बावनकुळे घेतील. मला बीडला पाठवलं तर मी जाईन. खरंतर मुख्यमंत्री कोणत्याही जिल्ह्याचं पालकत्व घेत नसतात. पण गडचिरोलीचं पालकमंत्रीपद घ्यावं अशी इच्छा असल्याचं मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखवलं. आता याबाबत अंतिम निर्णय काय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे.

# मनोज जरांगे पुन्हा सक्रीय देवेंद्र फडणवीसांना इशारा

### २५ जानेवारी २०२५ पासून आमरण उपोषण सुरू



आता खरी मजा आहे, हिशोब चुकता करण्याची वेळ आली आहे. होऊ द्या आता. पहिले हा दुसऱ्यांवर ढकलत होता ना, मी विरोध करत नाही, मी द्या असे म्हणतो. आता कळेल आरक्षण देतो की नाही ते, या शब्दांत मराठा आरक्षणाचे नेतृत्व करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना इशारा दिला आहे. मनोज जरांगे पाटील परभणी दौऱ्यावर आहेत. मनोज जरांगे परभणीत सूर्यवंशी कुटुंबीयांची तर मस्साजोगमध्ये संतोष देशमुख कुटुंबीयांचीही सांत्वनपर भेट घेणार आहेत. कोणाचेही बाप येऊ द्यात, ते मॅटर मी दबू देणार नाही. कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत मी हटणार नाही. सरकारला एकमेकांना मोबाइलचे फोन केलेले तपासायला एवढे दिवस लागतात का, अशी विचारणा मनोज जरांगे पाटील यांनी केली. २५ जानेवारी २०२५ पासून आम्ही अंतरवालीमध्ये आमरण उपोषण सुरू करणार आहोत. मराठा आरक्षणासाठी लढा देणार आहे. आमच्या मागण्यांची अंमलबजावणी करा, अन्यथा सरकारला भयंकर आंदोलन बघावे लागेल. राज्यभरातील मराठ्यांनी अंतरवलीकडे यायचे आहे. मराठ्यांची ताकद पुन्हा एकदा दाखवा. सर्वांनी स्वतः हा मेसेज सोशल मीडियावर पोस्ट करा. हे आंदोलन गरीब मराठ्यांनी हातात घ्यायचे आहे, असे आदेश मनोज जरांगे यांनी यावेळी बोलताना दिले आहेत

# स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी लाखोच्या संख्येने मूक मोर्चामध्ये सामील व्हा: मौलाना आझाद युवा मंच

बीड । प्रतिनिधी

मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या निघृण हत्या कर्णाया क्रूरकर्त्यांना तातडीने अटक करून त्यांना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथून काळे कपडे काळे झेंडे आंधळकोट मूक मोर्चा पोलीस अधीक्षक कार्यालय येथील मूक मोर्चा काढण्यात येणार आहे यात लाखोचे संख्येने नागरिकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन मौलाना आझाद युवा मंच चे जिल्हाअध्यक्ष अरफात खान व शहराध्यक्ष सय्यद सलमान यांनी केले आहे, सरपंच संतोष देशमुख



यांचे अपहरण करून खूनाची घटना घडल्याने बीडचे बिहार करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी बीडमध्ये सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वधर्मीय मोर्चा निघणार आहे. स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सर्व समाज एकत्र येवून,दिनांक २८ रोजी शनिवार ठीक अकरा वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर पोलीस अधीक्षक कार्यालय पर्यंत मूक मोर्चा काढण्यात येणार आहे या मुख मोर्चामध्ये लाखोंच्या संख्येने या मोर्चामध्ये सहभागी व्हा असे आवाहन मौलाना आझाद युवा मंचच्या वतीने करण्यात आले आहे.

# २८ तारखे पर्यंत आरोपी अटक झाले नाही तर मी स्वत उपोषणाला बसणार!

### मास्टरमाईंडचा शोध घेऊन कडक कारवाई करावी; मुख्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर फक्त एसपी बदलला, १५ दिवस झाले तरी फरार आरोपी का सापडत नाही?

संतोष देशमुख हत्याप्रकरणी फरार आरोपींचा आणि मास्टरमाईंडचा शोध घेऊन त्यांना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना केली. तसेच मुख्यमंत्र्यांनी निवेदन केल्यानंतर फक्त एसपी बदलले असून याउपर काहीच नाही. यामुळे मुख्यमंत्र्यांनी शब्द पाळावा असे म्हणत २८ तारखेच्या अगोदर सर्व मारेकरी अटक नाही झाले तर मी उपोषणाला बसणार असा इशारा बजरंग सोनवणे यांनी दिला. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी राज्यात रोष असून, येत्या शनिवारी (दि.२८) बीड येथे मोर्चा काढण्यात येणार आहे. याप्रकरणी पत्रकार परिषद घेऊन खासदार बजरंग सोनवणे यांनी प्रशासन आणि शासनाला धारेवर धरले आहे. यावेळी बोलतांना ते म्हणाले की, हत्या



### शनिवारी मोर्चात सर्वांनी सहभागी व्हा; पोलिसांचे सीडीआर काढा

होऊन पंधरा दिवस होऊन गेले पण फरार तीन आरोपी पोलिसांना सापडत नाही. याचा मास्टरमाईंड सापडत नाही. असे कोण हे मोठे आरोपी आहेत. याचा शोध घेतला पाहिजे, चौथा पकडलेल्या आरोपीचा सीडीआर काढा, तसेच पोलीसांचे सीडीआर काढा अशी मागणी केली. तसेच मुख्यमंत्र्यांनी सभागृहात निवेदन करुन कठोर शासन करण्याचे आश्वासन दिले. याला चार दिवस झाले असून यानंतर केवळ बीडचा एसपी बदलला गेला या व्यतिरिक्त काहीच घडलं नाही. आरोपी का सापडत नाही असा प्रश्न उपस्थित केला. येत्या २८ तारखेपर्यंत सर्व मारेकरी अटक झाले पाहिजे अन्यथा मी उपोषणाला बसणार असा इशारा खासदार सोनवणे यांनी दिला. खंडणी आणि मर्डर हे एकच प्रकरण आहे. या दोन्ही गुन्ह्यातील आरोपी एकच आहेत. यामुळे यांचा शोध घ्यावा व त्यांना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली.



### मोर्चाला खासदार शरद पवार उपस्थित रहाण्याची शक्यता

सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक करा, न्याय द्यावा यासाठी शनिवारी (दि.२८) रोजी सर्व पक्षीय मुक मोर्चाचे बीड येथे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्वे सर्वा शरद पवार यांची उपस्थिती राहणार असल्याची शक्यता आहे. या बाबतीत राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू आहे.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर



## संपादकीय

# आखाती देशाबरोबर मैत्री

कुवेत हा पश्चिम आशियातील अगदी छोटासा देश आहे. सगळ्याच आखाताला खनिज तेल सापडल्यानंतर सोन्याचे दिवस आले आणि त्यांची भाग्यरेषा साऱ्या जगात चमकून उठली. मात्र, कुवेतशी भारताचे आणि त्यातही मुंबईचे फार जुने ऋणानुबंध होते. सन १९६१ पर्यंत कुवेतमध्ये भारतीय रुपया हा अधिकृतपणे चलन म्हणून मान्यताप्राप्त होता. कुवेतची भूमी तेलसंपन्न होण्यापूर्वी अनेक शतके कुवेतशी आपला व्यापार होता आणि तेलामुळे त्याला एक नवा आयाम मिळाला. सन १९८१ मध्ये दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी भेट दिल्यानंतर मोदी हे कुवेतला भेट देणारे पहिले भारतीय पंतप्रधान ठरले आहेत. मोदी यांनी आखाती देशांच्या संबंधांवर दिलेला भर हा अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण आहे. त्याला केवळ आर्थिक अंग नाही. सांस्कृतिक, धार्मिक सौहार्दाचेही अंग आहे. भारताचा जगभरातला ठसा वाढवण्याची महत्त्वाकांक्षा त्यामागे आहे. पंतप्रधान असताना डॉ.मनमोहनसिंग यांनी दहा वर्षांत तीनदा आखाती देशांचा दौरा केला. मोदींचा हा चौदावा आखात दौरा आहे. यावरून भारताच्या दृष्टीने आखाताचे महत्त्व समजावे. भारतात कुवेती आणि कुवेतमध्ये भारतीय यांची वस्ती यांना शेकडो वर्षांचा इतिहास आहे. त्याही आधीच्या संबंधांचा उलगडा अनेक उत्खननांमधूनही झाला आहे. हा भूतकाळ जितका मोलाचा, तितकाच वर्तमानही. याचे कारण, कुवेतमध्ये आज दहा लाखांहून अधिक भारतीय काम करतात. यात हिंदू, मुस्लिम, ख्रिस्ती असे सगळेच आहेत. कुवेतमधील तीस टक्के कर्मचारी-कामगार भारतीय असावेत, यावरून कुवेतच्या अर्थकारणातील भारताचे मोल लक्षात यावे. मोदी यांनी कुवेती वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतीत कुवेतशी तेलाव्यतिरिक्त इतर क्षेत्रांमध्ये आर्थिक संबंध वाढविण्यावर भर दिला. तिथल्या भाषणांमध्येही हा मुद्दा आला. याचा अर्थ, कुवेत किंवा आखाती देश सध्या जसा त्यांच्या खनिज तेलोत्तर भविष्याचा वेध घेत आहेत; तसाच वेध भारतही एक मित्रराष्ट्र म्हणून घेत आहे. या सहकार्याच्या शक्यता अगणित आहेत आणि औषधांपासून उत्पादन उद्योगांपर्यंत आणि माहिती तंत्रज्ञानापासून आरोग्य व शिक्षणापर्यंत त्या विस्तारल्या आहेत. केवळ कुवेतवासी भारतीय प्रचंड पैसा मायदेशी पाठवतात असे नव्हे, तर कुवेत आपल्याला इंधनतेल पुरवतो आणि तिथले अनेक उद्योग भारतीय उद्योजक चालवतात. आखाती देश म्हणजे इस्रायलविरोधी देशांची आघाडी किंवा जगातील मुस्लिम राष्ट्रांच्या सामूहिक शक्तीचे प्रतीक; ही दोन्ही आकलने झपाट्याने बदलत गेली आहेत. जमिनीवरचे वास्तवही पुरते बदलून गेले आहे. आखाताच्या भू-राजकीय स्थितीकडे आणि राजकारणाकडे भारताने फार मोकळ्या दृष्टीने पाहण्याची गरज होती. यातली काही पावले पी. व्ही. नरसिंह राव यांनी टाकली होती. मोदींनी पूर्ण ताकद लावून सगळ्याच संबंधशक्यता आजमावून पाहिल्या आहेत. त्यांची फळे पुढच्या दोन ते तीन दशकांमध्ये वाढत्या प्रमाणात मिळतील. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये इतर मुस्लिम राष्ट्रांशी असणाऱ्या मैत्रीला पाकिस्तानचा एक कोन सदैव असे. इतिहासात तेलोत्पादक देशांच्या संघटनेचे अनेक ठराव पाहिले तर ते भारतविरोधी आणि पाकिस्तानची पाठराखण करणारे आहेत. भारताच्या वाढत्या आर्थिक ताकदीने आणि त्याच वेळी पाकिस्तानची वाढती दुर्दशा होण्याने हा कोनच निखळून पडला आहे. आशिया खंडातील हे फार मोठे स्थित्यंतर आहे. भारतात किरकोळ काही संघर्ष झाले तर डोळे वटारणारे आखाती देश आता ङ्गतो भारताचा अंतर्गत प्रश्न आहे,फ असे म्हणून गप्प बसू लागले आहेत. याच कुवेतमध्ये एके काळी देशातील सर्व हिंदू कर्मचाऱ्यांना मायदेशी परत पाठविण्याचा प्रस्ताव आला होता. आता तसा पुन्हा येणे शक्य नसले तरी आपल्या देशांतर्गत वर्तनाचे जगात काय परिणाम होत असतात, याचे भान बोलभांड अतिरेक्यांनी ठेवायला हवे. मोदींना कुवेतने अत्यंत आदराची वागणूक तर दिलीच; पण देशातला सर्वोच्च किताबही प्रदान केला. हा केवळ त्या व्यक्तीचा गौरव नसतो. भारताकडे कुवेत आता कसा पाहतो, याचे ते निदर्शक असते. आज सगळेच आखाती देश तेलोत्तर वाटचालीची परिकल्पना मांडत-आजमावत आहेत. या प्रवासात चीनपेक्षा भारत हा अधिक विश्वासार्ह साथीदार असणार आहे; असा एक संदेश सातत्याने जातो आहे. तो या मोदीभेटीने बळकट झाल

# पालकमंत्रिपदाचे ऑलिम्पिक

महायुतीला विधानसभा निवडणुकीत राक्षसी बहुमत मिळाले. युती सरकारची स्थापना होऊन महिना उलटला. आता जनतेच्या कल्याणकारी योजना मार्गी लागणार अशा आशा निर्माण झाल्या; परंतु कसचे काय! जनतेचे कल्याण राहिले बाजूला उलट मुख्यमंत्रिपद ते मंत्र्यांचे खातेवाटप यात विविध क्रीडा प्रकार सुरू झाले. प्रथम मुख्यमंत्रिपदाचा घोळ झाला नंतर मंत्रिमंडळाचा पायघोळ सुरू झाला. अखेर मंत्रिमंडळाची रचना झाली. ती होताना कबड्डी, खोखो, सूरपारंब्या, नुरा कुस्ती आदींचे दर्शन घडले. क्षणभर मंत्रिमंडळाचे ऑलिम्पिकच सुरू झाले की काय, असे वाटले. मंत्रिमंडळाचे खातेवाटप करताना महायुतीतील घटक पक्षांत घमासान झाले. रुसवे फुगवे कसे असतात ते दिसले. एकदाचे खातेवाटप झाले. आता पालकमंत्रिपदासाठी रस्सीखेच सुरू झाली आहे. मुंबईसाठी भाजप व शिंदे गटाने दावा केला आहे आणि आगामी पालिका निवडणुकांसाठी मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून महिना झाला तरी राज्यातील महायुती सरकार अद्याप स्थिरसावर झालेले नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री जाहीर झाले, मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. खातेवाटपाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर आता जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदासाठी शिंदे गट व भाजपकडून जोरदार दावा केला जात आहे. जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मिळावे म्हणून इच्छुकांकडून पक्षश्रेष्ठींकडे फिल्डिंग लावली जात आहे. आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन भाजप व शिंदेंच्या शिवसेनेकडे मुंबई शहर व उपनगराचे पालकमंत्रिपद जाईल, असे सांगण्यात येते मात्र, भाजपचे मंत्री आशिष शेलार यांना मुंबई शहराचे पालकमंत्रिपद हवे आहे तर मुंबई उपनगराचे पालकमंत्रिपद मिळावे म्हणून मंगलप्रभात लोढा, नितेश राणे, उदय सामंत इच्छुक आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार बराच रखडला. मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतर नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरू झाले तरी खातेवाटप झाले नाही. अखेर अधिवेशन संपल्यानंतर खातेवाटप जाहीर झाले. आता पालकमंत्रिपद मिळावे यासाठी भाजप, शिंदेंची शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातील मंत्र्यांचे पक्षश्रेष्ठींकडे लॉबिंग सुरू आहे. अनेक मंत्र्यांनी आपापल्या जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदासाठी फिल्डिंग लावली आहे. महायुतीत पालकमंत्रिपदावरून जोरदार रस्सीखेच सुरू आहे. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावर मंत्री भरत गोगावले यांनी दावा केला आहे तर अदिती तटकरे यांनीही या पदासाठी दावा केला आहे. बीडचे पालकमंत्रिपद धनंजय मुंडे यांना मिळणार की पंकजा मुंडे यांना, याकडे सा-यांचे लक्ष लागले आहे. संभाजीनगरमध्ये संजय शिरसाट की अतुल सावे याबाबत उत्सुकता आहे. रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक, पुणे, मुंबईच्या पालकमंत्रिपदासाठी अनेक दावेदार आहेत. यामुळे आमच्यात पालकमंत्रिपदावरून समन्वय आहे, मतभेद नाहीत, असे महायुतीचे नेते कितीही सांगत असले तरी या पदावरून वाद होत आहेत हे उघड झाले आहेत. ३५ जिल्हे आणि ४१ मंत्री असल्याने पालकमंत्रिपदाचे वाटप अवघड बनले आहे. अनेक जिल्ह्यांना एकाहून अधिक मंत्रिपदे मिळाल्याने तिथे पालकमंत्रिपदाचा पेच निर्माण झाला आहे. महायुती सरकारमधील खातेवाटपातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नाराजी स्पष्ट दिसते आहे. निवडणुकीचे निकाल जाहीर झाले तेव्हा एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपदावर आपलीच फेरनिवड होईल, असे वाटले होते. या पदासाठी ते अक्षरश: रूसून बसले होते. आपली फेरनिवड व्हावी यासाठी त्यांनी दबावाचे राजकारण सुरू केले. काळजीवाहू मुख्यमंत्रिपद त्यांच्याकडे होते; परंतु ते आपल्या दरे गावी निघून गेले. त्या वेळी शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट म्हणाले होते की, काही महत्त्वाचे निर्णय घ्यायची वेळ आली की, एकनाथ शिंदे आपल्या गावी जातात. शिंदे गावी गेले आणि आजारी पडले. काळजीवाहू मुख्यमंत्र्यांची काळजी घेण्याची वेळ राज्यावर आली; परंतु एकनाथ शिंदे यांच्या नाराजीनाट्याला यश आले नाही. मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस यांचीच निवड झाली तेव्हापासून शिंदे यांच्या नाराज चेह-यावर आजवर हास्य फुलले नाही. मुख्यमंत्रिपद गेले तरी किमान गृहमंत्रिपद तरी मिळेल, अशी आशा होती; परंतु तीही फोल ठरली तेव्हा शिंदे यांचा नाराज चेहरा आणखी काळवंडला. आता पालकमंत्रिपद वाटपाच्या निमित्ताने तो आणखी काळाठिक्कर पडला आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांना नगर विकास, गृहनिर्माण व सार्वजनिक बांधकाम विभाग ही खाती मिळाली आहेत. आपल्या अनेक मंत्र्यांना महत्त्वाची खाती न मिळाल्याने त्यांना शिंदे यांनी ङ्गश्रद्धा व सबुरीफ्चा सल्ला दिला आणि स्वत: मात्र अचानक दरे गावी निघून गेले. खातेवाटप झाल्यानंतर आणि हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर नवे मंत्री आपापल्या मतदारसंघात परतले आहेत. तेथे त्यांचे सत्कार समारंभ सुरू आहेत. मंत्रिपदाची शर्यत संपल्यानंतर त्यांची पालकमंत्रिपदासाठी स्पर्धा सुरू आहे. जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व ठेवण्यासाठी पालकमंत्रिपद महत्त्वाचे ठरते. विशेषत: जिल्हा नियोजन समितीकडील निधीचे वाटप पालकमंत्र्यांच्या अधिकारात होते तसेच प्रशासकीय व पोलिस यंत्रणाही हाताखाली राहते. त्यासाठी प्रत्येक मंत्र्याला आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मिळावे, अशी आशा असते. यामुळे खातेवाटप जाहीर होताच पालकमंत्री होण्यासाठी स्पर्धा सुरू होते. सध्याच्या मंत्रिमंडळात १६ जिल्ह्यांना प्रतिनिधीत्व मिळालेले नाही त्यामुळे एकापेक्षा अधिक मंत्रिपदे असलेल्या जिल्ह्यातील नेत्यांना बाहेरच्या जिल्ह्याचे पालकमंत्रिपद भूषविण्याची संधी मिळू शकते. मंत्रिमंडळात २ उपमुख्यमंत्र्यांसह ३५ कॅबिनेट मंत्री असल्याने राज्यमंत्र्यांना फार संधी मिळू शकेल, असे वाटत नाही. मंत्रालयातील दालनांवरूनही रुसवे-फुगवे सुरू झाले आहेत.

# देशभक्त आंबेडकरांच्या विरोधात तडीपार देशद्रोही अंधभक्त

पूर्वीचा एक तडीपार आजचा गृहमंत्री अमित शहा मनुवादी मानसिकता डोक्यात ठेऊन आंबेडकर...! आंबेडकर....! आंबेडकर.....! काय बोलला तर देशात विदेशात त्यांच्या हुकुमशाहीला सुरुंग लागला. देशद्रोही अंधभक्त ही अमित शहा ला वाचवण्यासाठी पुढे येण्यास घाबरत आहेत. जीवंत आंबेडकर पेक्षा ६८ वर्षा नंतर ही त्यांच्या आंबेडकर नांवाच्या वैचारिक बुद्धिमतेच्या दहशतीपुढे झुकावे लागत आहे. म्हणजे मृत्यू नंतर ही आंबेडकर नांव चुकीचे घेतले तर केवढा मोठा भूकंप होऊ शकते. हे मोदी शहा ला आता कळायला लागले. आंबेडकर म्हणजे फक्त एक व्यक्ती नव्हे,तर जगातील शोषितांच्या ह्दयात धगधगत ठेवलेली ऊर्जा आहे.आंबेडकर हे नाव घेतले की,विषमतेविरुद्ध लढणाऱ्या एका योद्ध्याची आठवण होते.त्यांनी फक्त भारतालाच नव्हे,तर जगभरातील अन्यायग्रस्त आणि शोषितांना प्रेरणा दिली आहे.त्यांनी १९२७ साली महाडच्या चवदार तळ्याच्या पाण्याला हात लाऊन देशात क्रांतिकारी विचारांची सुरवात केली होत. पाण्याला आग लागत नाही,पण आंबेडकरांनी पाण्याला हात लाऊन मानुवादयांच्या बुढाला आग लावल्याचा इतिहास केंद्रात २०१४ पासून आपले सरकार आल्यावर काहीच करू शकत नाही. ही खंत त्यांना स्वस्थ बसू देत नाही. म्हणूनच ते आंबेडकर आंबेडकर आंबेडकर फॅशन झाल्याचे म्हणाले. आजही देशातील कोणतीही समस्या सोडविण्यासाठी आंबेडकर यांचा प्रभाव



सागर तायडे,
भांडुप मुंबई,९९२०४०३८५९
लेखक: स्वतंत्र मजदुर युनियन(ILU) महाराष्ट्र राज्य अध्यक्ष आहेत.

कोणत्याही भाषणात,चर्चेत किंवा चळवळीत अनुभवायला मिळतो.त्यांचे विचार म्हणजे सूर्याच्या किरणांसारखे आहेत,जे अंधकाराचा नाश करून प्रकाश देतात.त्यांचं अस्तित्व गुलामांच्या बेड्या तोडणाऱ्या आवाजात ऐकायला मिळतात, म्हणूनच तर त्यांचा इतिहास मनुवादाच्या छातीत धडधडत असतो.आंबेडकरांच्या संघर्षातून शोषितांना जगण्यासाठी नवा विश्वास मिळाला.त्यांनी केवळ संविधान रचले नाही,तर प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांसाठी एक नवा मार्ग दाखवला. आंबेडकर हे त्या प्रत्येकाला साथ देतात,जो अन्यायाविरुद्ध लढतो.ते केवळ एका कालखंडापुरते मर्यादित राहिलेले नाहीत,तर जगभरातील शोषितांच्या मुठीत बंदिस्त असलेली शक्ती बनले आहेत. त्यांच्या कार्यामुळे समाजातील अनेकांनी आपल्या बेड्या तोडल्या, शिक्षण घेतले, स्वाभिमानाने उभे राहणे शिकले. आंबेडकरांनी शिकवले की,केवळ शिक्षणाचे बळच शोषण आणि विषमता संपवू शकते.आज प्रत्येक तिरस्कृत नजरेत आणि भयग्रस्त प्रश्नात, समस्यात आंबेडकरांचा इतिहास जिवंतआहे.

# श्री महालक्ष्मी व्रतासोबत महाकालीची उपासनाही आवश्यक !

सध्या मार्गशीर्ष महिना सुरु आहे. या महिन्यातील गुरुवारी बहुतांश महिला श्री महालक्ष्मी व्रत करतात. या दिवशी दिवसभर उपवास केला जातो. चौरंगावर श्री महालक्ष्मीच्या रूपाने कलश मांडून तिची मनोभावे पूजा केली जाते. सुगंधी फुलांचा गजरा किंवा वेणी माळली जाते. देवीसमोर श्री महालक्ष्मी व्रताची कथा आणि महती महिती यांचे वाचन केले जाते. देवीची आरती केल्यावर देवीला पाच फळांचा नैवेद्य दाखवला जातो. गेल्या काही वर्षांपासून पूजेच्या कलशावर देवीचा मुखवटा लावून त्यावर वस्त्र आणि दागिने यांची सजावट करण्याची पद्धत रूढ होऊ लागली आहे. अनेक महिला हौस म्हणून पूजेच्या चौरंगाभोवती आकर्षक फुलांची सजावट करतात, दाराबाहेर रांगोळी काढून दारात पणत्या लावतात. नैवेद्यासाठी गोडधोड बनवतात. महाराष्ट्रात बहुतांश प्रांतात महिला हे व्रत करत असून वर्षागणिक व्रत करणाऱ्या महिलांच्या संख्येत वाढच होत आहे. शहरासारख्या ठिकाणी नोकरी व्यवसाय करणाऱ्या महिलाही वेळात वेळ काढून हे व्रत करतात. येणारा गुरुवार हा मार्गशीर्ष महिन्यातील अखेरचा गुरुवार असणार आहे. या दिवशी महालक्ष्मी व्रताचे उद्यापन केले जाते त्यानिमित्ताने सवाष्ण महिलांना वाण, गजरा अथवा फुल आणि हळद कंकू दिले जाते. श्री महालक्ष्मी देवीप्रती असलेली श्रद्धा याबरोबरच महालक्ष्मी देवीची कृपा आपल्या कुटुंबावर सदैव राहावी हा सकाम हेतूही या व्रतामागे दडलेला असतो. शालेय जीवनात ज्ञानार्जन करून आपण श्री सरस्वती देवीची उपासना करत असतो. अनेक महिला आज उच्च शिक्षण घेऊन न्याय, वैद्यक, संशोधन, सैन्य, पोलीस आदी सर्वच क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. उद्योजक क्षेत्रातही अनेक महिलांनी आज उत्तुंग भरारी घेतली आहे. राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढू लागला आहे. त्या त्या क्षेत्रातील ज्ञान घेऊन त्यामध्ये पारंगत होणे ही श्री सरस्वती देवीची उपासनाच आहे. शक्तीची अर्थात देवीची तीन प्रमुख रूपे आहेत. त्यांतील श्री सरस्वती आणि श्री महालक्ष्मी या देवीच्या तारक रूपाची उपासना आपण प्रत्येक जण करत आपापल्या परीने करत असतो; मात्र देवीच्या ज्या रूपाच्या उपासनेची आज नितांत आवश्यकता आहे त्या भक्तांच्या उद्धारासाठी दृष्टांचा संहार करणाऱ्या महाकालीची उपासना महिलावर्ग केव्हा करणार आहे ? सध्याची



सौ.मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई

देशाची आणि समाजाची स्थिती पाहता कोणत्याच क्षेत्रात महिला सुरक्षित नाहीत. स्त्री अत्याचारांच्या घटनांमध्ये वर्षागणिक कमालीची वाढ होऊ लागली आहे. शहर असो वा खेडे, गरीब असो वा श्रीमंत, शाळकरी कन्या असो वा वयोवृद्धा वासनांधांच्या विखारी नजरांपासून आज कोणीच सुरक्षित नाहीत, दर मिनिटागणिक देशात कुठल्या ना कुठल्या ठिकाणची स्त्री आज अत्याचाराला बळी पडू लागली आहे. स्त्री अत्याचारावर अंकुश आणण्यासाठी कठोर कायदे करूनही या घटनांमध्ये घट झालेली नाही. स्त्रीने आर्थिक दृष्ट्या सबळ व्हावे यासाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली मात्र महिलांच्या सुरक्षेसाठी शासन राबवत असलेल्या योजना केवळ नावाला शिल्लक असल्याने स्त्री अत्याचाराचा आलेख तिळमात्र कमी होताना दिसत नाही. ज्या महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांनी परस्त्रीला मातेसमान मानण्याची शिकवण दिली त्याच छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात स्त्रीची होत असलेली अवहेलना लज्जास्पद आहे. पोलीस प्रशासन असो वा नातेवाईक, सर्वच ठिकाणी स्त्रियांच्या मदतीला धावून येऊ शकत नाहीत. त्यासाठी स्त्रियांनी स्वतःचे रक्षण स्वतः करण्यासाठी सिद्ध व्हायला हवे. प्रतिकूल प्रसंग केव्हा येईल ही वेळ कधी सांगून येत नाही त्यासाठी आपले मन आणि शरीर सततच प्रतिकारक्षम ठेवण्याची गरज आहे आणि त्याकरिता प्रत्येक स्त्रीने स्वतःचे रक्षण स्वतः करण्याची कला अवगत करून घ्यायला हवी. स्वसंरक्षणाचे किमान प्रशिक्षण प्रत्येकीने आजच्या काळात घ्यायलाच हवे. देवीच्या महाकाली स्वरूपात तिच्या प्रत्येक हातात शस्त्र आहे. या शस्त्रांचा वापर करून तिने सजनांचे रक्षण आणि दृष्टांचा संहार केला आहे. देवीच्या या रूपाची उपासना आज प्रत्येकी स्त्रीने करायला हवी. राणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ, राणी चेन्नमा यांनी आपल्या राज्याच्या रक्षणासाठी प्रसंगी शस्त्र हाती घेऊन पराक्रम गाजवला आहे, पराक्रमी स्त्रियांची अशी अनेक उदाहरणे इतिहासात घडून गेली आहेत. या प्रत्येकीने शस्त्रांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले होते, त्यांच्यामध्ये कमालीचे मनोधर्य आणि दुर्दम्य इच्छाशक्ती होती. या रणरागिणींचा आदर्श समोर ठेवून समाजात माजलेल्या वासनांध शक्तींचा संहार करण्यासाठी आता प्रत्येक स्त्रीने सज्ज हायला हवे. लाठीकाठी, ज्युडो काराटे आदींचे अद्यावत प्रशिक्षण घेऊन दृष्ट शक्तींवर प्रहार करण्यासाठी सज्ज व्हायला हवे. स्त्रीची अबला ही ओळख पुसून ती प्रसंगी सबला होऊन रणरागिणीही होऊ शकते हे समाजाला दाखवून देण्याची वेळ आली आहे. विद्येची देवता श्री सरस्वती, धनाची देवता श्री महालक्ष्मी यांसोबत येणाऱ्या नवीन वर्षात शक्तीची देवता श्री महाकाली मातेची उपासना करण्याचा संकल्प करूया. जेणेकरून येणाऱ्या काळात राज्यातील स्त्री अत्याचाराचा आलेख उतरलेला असेल

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २६ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# अल्पवयीन शाळकरी मुलास बॅटने मारहाण गुन्हा दाखल बाले पीर भागातील घटना

तुम्ही इथे क्रिकेट का खेळता असे म्हणून शिवीगाळ करत हाताळतील बॅटने अल्पवयीन शाळकरी मुलास मारहाण केल्या प्रकरणी जिशान खान मोईन खान रा चाऊस गल्ली बीड यांच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३२६. ३२४. ५०४., व ५०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत सविस्तर माहिती अशी की पोलीस कॉलनी बाले पीर येथील पोलीस ग्राउंडवर मुलासह क्रिकेट खेळण्यासाठी सय्यद बदरोद्दीन खमरोद्दीन व् सय्यद राशेद हसनोद्दीन हे गेले असता तेथे जिशान खान मोईन खान येऊन आम्ही दररोज क्रिकेट खेळतो तुम्ही इथे क्रिकेट का खेळतात असे म्हणून शिवीगाळ करत हातातील बॅटने मारहाण करण्यास सुरुवात केले या मारहाणीत स बदरोद्दीन यांच्या डोक्यात बॅटने मारहाण झाल्याने त्यास काकू नाना हॉस्पिटल येथे उपचारास दाखल केले असता बदरोद्दीन यांच्या डोक्याच्या डाव्या बाजूस आतील भागात गंभीर मारहाण झाल्याने त्यास पुढील उपचारा करिता डॉक्टरांनी पुण्यात घेऊन जाण्यास सांगितले असता त्यास ससून हॉस्पिटल येथे त्याची शस्त्रक्रिया करण्यात येऊन आरामाच्या सल्ला दिला होता पोलीस ग्राउंड बाले पीर येथे सय्यद बदरोद्दीन व सय्यद रशेद यांना बॅटने मारहाण करून जखमी करत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली या प्रकरणी जिशान खान मोईन खान यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारासाठी अर्ज पाठविण्याचे आवाहन

मुंबई :- सन २०२४ वर्षातील मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी राज्य शासनाच्यावतीने स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार देण्यात येणार आहे. १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीत प्रकाशित झालेले प्रथम आवृत्ती पुस्तके स्पर्धेसाठी पात्र आहेत. लेखकांनी पुरस्काराच्या प्रवेशिका जिल्हाधिकारी कार्यालयात (मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून) दि. ३१ जानेवारी, २०२५ पर्यंत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत मुंबई येथे आपले साहित्य पाठवावीत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे. या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ यांच्या कार्यालयात तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता अन्यत्र संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात (सर्वसाधारण शाखा अथवा करमणूक शाखा) विनामूल्य उपलब्ध आहेत. महाराष्ट्र शासनाच्या ... या संकेतस्थळावर नवीन संदेश या सदरात स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२४ नियमावली व प्रवेशिका या शीर्षाखाली व या सदरात २०२४ या शीर्षाखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या ://... या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियमपुस्तिका उपलब्ध होतील. प्रवेशिका पूर्णतः भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक १ ते ३१ जानेवारी २०२५ या विहित कालावधीत पोहचतील अशा पाठवाव्यात. लेखक / प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करु शकतात. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यातील लेखक / प्रकाशकांनी पुस्तकांच्या दोन प्रतींसह विहित नमुन्यातील प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ येथे पाठवाव्यात. मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून अन्य ठिकाणच्या लेखक / प्रकाशकांनी संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये हे साहित्य दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ या विहित कालावधीत पाठवावे, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद आहे. लेखक / प्रकाशकांनी मंडळाकडे प्रवेशिका व पुस्तके पाठविताना सदर बंद लिफाफ्यावर / पाकीटावर स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२४ साठी प्रवेशिका असा स्पष्ट उल्लेख करावा. प्रवेशिका व पुस्तके स्विकारण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी, २०२५ हा राहील. विहित कालमर्यादेनंतर येणाऱ्या प्रवेशिका स्पर्धेसाठी स्विकारल्या जाणार नाहीत.

# संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांत कार्यकारिणीची घोषणा

बीड । प्रतिनिधी संस्कार भारती देवगिरी प्रांताची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी स्नेहल पाठक, महामंत्रीपदी डॉ.जगदीश देशमुख, सरंक्षक म्हणून भरतअण्णा लोळगे यांची निवड करण्यात आली आहे. येथील शास्त्रीनगर सभागृहात संस्कार भारतीची विशेष सर्वसाधारण सभा संस्कार भारतीचे अखिल भारतीय मंत्री आशुतोष आडोनी आणि पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली,यावेळी संस्कार भारती देवगिरी प्रांताची नवी रचना आणि संपूर्ण पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. संपूर्ण कार्यकारिणी– संरक्षक–भरतअण्णा लोळगे,सल्लागार– सुधीर कुलकर्णी, अध्यक्षस्नेहलताई पाठक, कार्याध्यक्ष भगवानराव देशमुख, उपाध्यक्ष–विश्वनाथ दाशरथे,डॉ.अरविंदराव देशमुख, सुनीता घाटे,देवेंद्र कुलकर्णी, महामंत्री डॉ.जगदीश देशमुख,सह महामंत्री सतीश महामुनी आणि अभय शृंगारपुरे, मंत्री प्रमोद वझे,रवींद्र देशपांडे, शरद दांडगे,धनंजय देशपांडे,कोष प्रमुख–मोहन रावतोळे, सह कोषप्रमुख संजय घायाळ,मातृशक्ती प्रमुख गीता रावतोळे,मंचीय कला संयोजक –डॉ जयंत शेवतेकर,संगीत पं. संजय जोशी, सहसंगीत दिलीप चौधरी,नृत्य– रमा करजगावकर आणि विक्रांत वायकोस, नाट्य– निलेश देशपांडे,सहनाट्य विजय करभाजन आणि गिरीधर पांडे,दृश्य कला संयोजक शेषनाथ वाघ,सह संयोजक संतोष पाठक,भू–अलंकरण अमित देशपांडे,छायाचित्र–फोटोग्राफी पद्माकर मोकासे,चित्रकला– केदार नाईक, सह चित्रकला– अनिल पाटील,लोककला संयोजक डॉ.मार्तंड कुलकर्णी,सह संयोजक डॉ.वैशाली गोस्वामी,सारंग रोकडे,शेखर भाकरे,साहित्य विधा संयोजक डॉ.विद्यासागर पाटांगणकर, सह संयोजक नारायण पांडव आणि धनंजय गुडसुरकर,कला धरोहर संयोजक प्रा.दत्तप्रसाद गोस्वामी,सह संयोजक– अजय कासोदेकर,प्रचार व प्रसिद्धी प्रमुख– महेश वाघमारे, कार्यकारिणी सदस्य जयेंद्र कुलकर्णी. या सर्व पदाधिकाऱ्यांचे यावेळी गुलाब पुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले.विशेष सर्वसाधारण सभेचा प्रारंभ संस्कार भारती ध्येयगीत गायन, दीपप्रज्वलन,नटराज पूजन आणि पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांना अभिवादन करून करण्यात आला. प्रारंभी पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे यांनी संस्कार भारतीच्या कार्याची नवी रचना विस्ताराने सांगितली तर अ. भा.मंत्री आशुतोष आडोनी यांनी मार्गदर्शन केले. आपले दायित्व हे मनःपूर्वक निभावले पाहिजे असे सांगून ते म्हणाले की विविध कार्यक्रम आयोजित करतांना यातून कलेच्या माध्यमातून देशहित आणि देशभक्तीचा विचार मांडला गेला पाहिजे.मानवी मनातील वाईट विचार दूर करण्यासाठी कला हे सर्वोत्तम साधन असून कलेच्या माध्यमातूनच समाजातील वाईट प्रवृत्ती दूर करीत सद्विचाराची पेरणी करता येते.आपल्या विस्तारित भाषणात त्यांनी विविध उदाहरणे देऊन आपले विचार स्पष्ट करीत संस्कार भारतीच्या पदाधिकारी आणि कला साधकांनी आपली कला राष्ट्राप्रति समर्पित करावी असे आवाहन केले.देवगिरी प्रांताच्या अध्यक्षा स्नेहल पाठक यांनी अध्यक्षीय समारोप करून नूतन पदाधिकारी बरोबर घेऊन अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.या सभेचे आभार प्रदर्शन आणि सूत्रसंचालन नारायण पांडव यांनी केले. सामूहिक पसायदान गायनानाने या विशेष सर्वसाधारण सभेचा समारोप करण्यात आला.या विशेष सर्वसाधारण सभेस संस्कारभारतीचे मार्गदर्शक ज्येष्ठ रंगकर्मी लक्ष्मीकांत धोंड, माधुरी धोंड यांची प्रमुख उपस्थिती लाभली .सभेच्या आयोजनात संस्कारभारती छत्रपती संभाजीनगरचे ज्येष्ठ कलासाधक अनिल संवत्सर,नाट्य विधा प्रमुख श्रीपाद पदे, अनुजा पाठक, कैलास आडे या कलासाधकांनी विशेष प्रयत्न केले

# स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी मूक मोर्चात लाखोंच्या संख्येने सामील व्हा



बीड (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांची निघृण हत्या करणा–या क्रूरकर्त्यांना तातडीने अटक करून त्यांना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून काळे कपडे, काळे झेंडे, आंधळकोट मूक मोर्चा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मूक मोर्चा काढण्यात येणार आहे. यात नागरिकांनी लाखोंच्या संख्येने सहभागघ व्हावे असे आवाहन मुस्लिम पक्ष शिष्टमंडळाने केले आहे. यात मुस्लिम समाजानेही हजारोंच्या संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन माजी सभापती जलील पठाण, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा नेते शेख अखील भाई, माजी उपाध्यक्ष नसीम भाई इनामदार, माजी उपाध्यक्ष शाकेर भाई, अय्यूब खान, शेख अय्युब शेख रहीम यांनी आवाहन केले आहे.

याविषयी थोडक्यात वृत्त असे की, सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आला. बीडचे बिहार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी बीडमध्ये सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वधर्मीय मोर्चा निघणार आहे. स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सोमवारी सर्वपक्षीय, सर्व समाज आणि संघटनांची एकत्र बैठक बीड शहरातील आशीर्वाद लॉन्स येथे आयोजित करण्यात आली होती. यात सर्वपक्षीय बैठकीत दिनांक २८ रोजी शनिवारी सकाळी ठीक ११:०० अकरा वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते पोलीस अधीक्षक कार्यालयापर्यंत मूक मोर्चा काढण्यात येणार आहे. या मुख्य मोर्चामध्ये लाखोंच्या संख्येने या मोर्चामध्ये सहभाग नोंदवावा. असे आवाहन मुस्लिम समाजातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या गटातील जलील पठाण, शेख अखील, नसीम इनामदार, शेख शाकेर, अफसर खान, शेख अय्युब, शेख रहीम आदींनी मुक मोर्चामध्ये लाखोंच्या संख्येने सामील व्हावे असे आवाहन केले आहे.

# आजच्या डिजिटल युगातील ग्राहकांच्या हक्कांची चर्चा होणे गरजेचे-जिरंगे

वडवणी । पतिनिधी मंगळवार दि. २४ डिसेंबर रोजी तहसिल कार्यालय वडवणी येथे राष्ट्रीय ग्राहक दिन दरवर्षीप्रमाणे नायब तहसीलदार संजय जिरंगे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. २४ डिसेंबर रोजी भारतीय ङ्गग्राहक दिनफ साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर आजच्या डिजिटल युगातील ग्राहकांच्या हक्कांची चर्चा होणे गरजेचे आहे. सध्या ऑनलाइन शॉपिंग आणि ई–कॉमर्सचा प्रचंड विस्तार झाला आहे. त्यामुळे ग्राहकांसमोर नवनवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळेच बनावट उत्पादने, सायबर फसवणूक आणि गोपनीयतेचे उल्लंघन यासंबंधीच्या अधिकारांबद्दल त्यांनी जागरूक असणे महत्त्वाचे आहे. आजच्या जगात ग्राहक हा राजा आहे. देशाची तसेच जगाची अर्थव्यवस्था भोवती फिरत असल्यामुळे ग्राहकाचे महत्त्व कमालीचे वाढले असून सगळी आर्थिक यंत्रणाच त्याच्याभोवती फिरत असल्याचे चित्र दिसते. त्यामुळेच दर वर्षी २४ डिसेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या भारतीय ग्राहक दिनाला अलीकडे आगळे महत्त्व आल्याचे दिसते. हा दिवस लोकांना ग्राहक चळवळीचे महत्त्व अधोरेखित करण्याची संधी देतोच; खेरीज ग्राहकाला त्याच्या हक्क आणि जबाबदाऱ्यांबद्दल जागरूक करतो. थोडक्यात, ग्राहक हक्क दिनाची उद्दिष्ट्ये साध्य करणे हे या सादरीकरणामागचे प्रयोजन असते. असे मनोगत व्यक्त करताना नायब तहसीलदार संजय जिरंगे साहेब यांनी केले.यावेळी प्रमुख पाहुणे ग्राहक पंचायत महाराष्ट्र वडवणी तालुका संघटक गणेश म्हेत्रे यांनी पार्श्वभूमीवर आणि या दिवसाच्या निमित्ताने ग्राहक संरक्षण कायद्याचे उद्दिष्ट जाणून घेणे गरजेचे आहे. त्यातील एक म्हणजे ग्राहकांनी सदोष वस्तू आणि सेवांची नेमकी पारख करणे. हे झाले तरच ते अशा नकली, अयोग्य वस्तू आणि सेवांच्या खरेदीपासून दूर राहू शकतील. आज व्यापाराच्या अनुचित व्यापारपद्धती सर्रास पाहायला मिळतात. यामार्फत ग्राहकांचे आर्थिक शोषण करण्याचे अनेक प्रकार घडताना दिसतात. अशा विविध प्रकारांपासून प्रभावी संरक्षण प्रदान करणे आणि याप्रती जागरूकता निर्माण करणे हे या दिवसाच्या साजरीकरणाचे एक उद्दिष्ट्य आहे. ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव व्हावी आणि फसवणूक, काळाबाजार इत्यादींना बळी पडल्यास तक्रार करता यावी यासाठी हा दिवस साजरा केला जातो. राष्ट्रीय ग्राहक दिन सातत्याने साजरा केला जात आहे. यानिमित्ताने विविध थीम्सचा आधार घेतला जातो. जसे की, एका वर्षी राष्ट्रीय ग्राहक दिनाची थीम ङ्गकॉम्बेटग प्लास्टिक पोल्युशनफ अशी होती. प्लास्टिक कचरा ही जगासमोरील एक मोठी समस्या बनली असल्याचे आपल्या सर्वांनाच माहीत आहे. या समस्येला तोंड देण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात असून अशा प्रकारच्या थीमवर एखादा दिवस साजरा करणे हा याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा महत्त्वाचा प्रयत्न म्हणायला हवा. आपले मनोगत व्यक्त केले.तसेच जिल्हा सहसंघटक गणेश टकले यांचे मार्गदर्शन झाले.आपल्याकडे ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ अस्तित्वात असून हा कायदा आजच्या काळात स्पर्धात्मक किमतींमुळे ग्राहकाची दिशाभूल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे सर्व लक्षात घेता २४ डिसेंबर या दिवसाचे महत्त्व अधोरेखित होते. भारतातील मोठी बाजारपेठ आणि इथला प्रचंड मोठा याबद्दल माहिती दिली जाते.आपल्या अधिकारांबद्दल जागरूक असणेही अत्यंत महत्त्वाचे आहे. आणखी एक महत्त्वपूर्ण मुद्दा पर्यावरण आणि ग्राहकांची जबाबदारी हा असून आज ग्राहकांची जबाबदारी केवळ त्यांच्या हक्कांपुरती मर्यादित नाही, तर पर्यावरणाप्रतीही आहे, जबाबदाऱ्या हा दिवस खऱ्या अर्थाने यशस्वी करण्याचा हाच एक मार्ग आहे. यावेळी ग्राहक दिन साजरा करण्यासाठी श्रीमती मॅडम पुरवठा निरीक्षण अधिकारी तहसील कार्यालय, विनायक दिवटे अव्वल कारकून, श्रीमती पारवे मॅडम, सदस्य नारायण जाधव, सुधाकर माळवदे, ओमप्रकाश जाधव, व स्वस्त धान्य दुकानदार मालक, ग्राहक नागरिक उपस्थित होत

# ऐतिहासिक अन प्रेक्षणीय स्थळांच्या सफरीने विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीत केली धमाल

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदगाव चिंचोली येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल ऐतिहासिक, प्रेक्षणीय स्थळांना भेटी देऊन उत्साहात पार पडली. तीन दिवसाच्या या सहलीत विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक स्थळांचा अभ्याससह प्रेक्षणीय स्थळांवर सहलीचा आनंद लुटला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदगाव चिंचोली येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल.नुकतीच पार पडली. या सहलीत तुळजापूर कोल्हापूर कनेरी मठ ज्योतिबा मंदिर पन्हाळा गड नानिज गणपतीपुळे महाबळेश्वर महाड जेजुरी व पंढरपूर हे प्रेक्षणीय स्थळे पाहणी करून शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न झाली.यावेळी इयत्ता ५ वी, ९ वीचे एकूण ६१ मुले आणि मुली सहभागी झाल्या होत्या. या संपूर्ण सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी खूपच धमाल केली. मुख्याध्यापक एम.डी.सिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यात शाळेतील शिक्षक श्री बागल सर श्री.नळे सर श्री.हळेधोंगडे सर श्री.मरकंटे सर चिंचोली शाळेचे मुख्याध्यापक श्री पाटील सर दिगंबर पाटील, श्रीमती महादाबाई हे सहलीमध्ये सहभागी होते.तर या शैक्षणिक सहलीसाठी परिवहन महामंडळाचे ड्रायव्हर यादव सुक्रे वाहक शिवाजी माचेवाड यांनी सहलीचा सर्व प्रवास सुखदायक केला.



# ना. पंकजा मुंडे इज इन ॲक्शन ; मंत्रिपदाची जबाबदारी येताच विभागाच्या अधिकाऱ्यांची घेतली आढावा बैठक

## पशुसंवर्धन विभागातील योजनांना गती देणार

राज्यातील पशुसंवर्धन विभागाचाही यावेळी त्यांनी आढावा घेतला.विभागाची स्थापना आणि वाटचाल विभागाची ध्येय धोरणे,राज्यातील पशुधन,राज्य व केंद्र पुरस्कृत योजना,एकात्मिक सर्वेक्षण योजना पशुगणना,जिल्हा वार्षिक योजना,विदर्भ मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प,पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ यासह राज्यातील पशुसंवर्धन विभागातील योजनांना गती देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे मंत्री पकंजा मुडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी बैठकीला महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिध्देश कदम,पशुसंवर्धन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार,पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव अविनाश ढाकणे यासह इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.यावेळी उपस्थित अधिकारी यांनी विभागाच्या योजना,सद्यस्थिती व भविष्यातील नियोजन याबाबत सविस्तर माहितीचे सादरीकरण केले.

पर्यावरण व वातारणीय बदल या विभागातील राबविण्यात येणा–या योजना,भविष्यातील ध्येय धोरणे,घनकचरा व्यवस्थापन,माझी वसुंधरा अभियान,पाणी,हवा प्रदुषण,नदी व तलाव संवर्धन, पर्यावरण जतन व संवर्धन जनजागृती उपक्रमां विषयी सुनियोजित आराखडा तयार करण्याच्या सूचना राज्याच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी विभागांचा आढावा घेताना दिल्या. खातेवाटप झाल्यानंतर मंत्रिपदाची जबाबदारी येताच ना. पंकजाताई मुंडे यांनी आज सहयाद्री अतिथीगृहात पर्यावरण आणि पशुसंवर्धन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी बोलतांना त्या म्हणाल्या की,राज्यातील घनकचरा व्यवस्थापन,पाणी,हवा प्रदूषण नियंत्रण,नदी व तलाव संवर्धन,पर्यावरण जतन व संवर्धन जनजागृतीपर उपक्रम,राज्यस्तरीय नदी संवर्धन



योजना,सागर तटीय विशेष राखीव क्षेत्र नियमन,स्थानिक स्वराज्य संस्थाचे घनकचरा व्यवस्थापन,प्लॅस्टीक निर्मुलन,राज्य नदी संवर्धन योजना,महाराष्ट्र पर्यावरण माहिती प्रणाली केंद्र,सृष्टी मित्र पुरस्कार,माझी वंसुधरा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे,पर्यावरणपूरक वातावरणासाठी मार्गदर्शक तत्वे तयार करणे,जैविक कचरा नियमावली,पर्यावरण जतन व संवर्धनासाठी राज्य, जिल्हा व ग्रामपातळीवर समित्या कार्यरत करणे, पर्यावरण क्लब स्थापन करणे.पाणथळ जागांचे संवर्धन यासाठी विशेष प्रयत्न करणे याबाबत सविस्तर नियोजन करा.त्यानुसार राज्यातील पर्यावरण विभागातील कामांना गती देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील असेही त्या म्हणाल्या.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २६ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## माजलगाव विकास प्रतिष्ठानची शैक्षणिक सहल संपन्न

माजलगाव प्रतिनिधी येथील माजलगाव विकास प्रतिष्ठानतर्फे आयोजित शैक्षणिक सहल दिनांक २१ व २२ डिसेंबर २०२४ रोजी यशस्वीरीत्या संपन्न झाली. सादोळा, रोड केसापुरी कॅम्प अंतर्गत माजलगाव, वडवणी व धारूर तालुक्यातील इयत्ता ७ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी बीड येथील गोरक्षनाथ टेकडी, कंकालेश्वर मंदिर आणि खंडेश्वरी मंदिराला भेट दिली. पाली येथील इन्फंट इंडिया या संस्थेस भेट देताना संस्थेचे संस्थापक बारगजे सर यांनी विद्यार्थ्यांना तेथील विविध उपक्रमांची माहिती दिली. हस्तकला व्यवसाय, रंगकाम, दैनंदिन उपक्रम, ग्रंथालय आणि वृक्षारोपण या उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली.सहलीचा विशेष आकर्षणाचा भाग म्हणजे श्री क्षेत्र कपिलधार येथील भेट होती. येथील भव्य धबधबा, निसर्गरम्य वातावरण, हिरवीगार झाडे, पशुपक्षांचा किलबिलाट आणि विस्तीर्ण अभयारण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी मनसोक्त लुटला.माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेल्या २० वर्षांपासून अनाथ मुलांसाठी विविध उपक्रम राबवले जात असून, सध्या ३५० हून अधिक विद्यार्थी या संस्थेचे लाभार्थी आहेत. शैक्षणिक साहित्य वाटप, गुणवंत विद्यार्थी सत्कार, किशोरवयीन मुलींसाठी कार्यशाळा, दिवाळी फराळ वाटप, क्रीडा स्पर्धा आणि सायकल वाटप असे विविध उपक्रम संस्थेमार्फत नियमितपणे राबवले जातात. या यशस्वी सहलीबद्दल आमदार प्रकाश दादा सोळंके, प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मंगलाताई सोळंके आणि सचिव नीला देशमुख, विरेन सोळंके, पल्लवीताई सोळंके यांनी समाधान व्यक्त केले. सहलीचे यशस्वी आयोजन पुरुषोत्तम सोळंके, संतोष पालकर, रेश्मा सय्यद, शिंदे मॅडम यांनी केले.या सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि सांस्कृतिक स्थळांची माहिती मिळाली असून त्यांच्या ज्ञानात भर पडली आहे.

# मराठा क्रांती मोर्चाचा सरकारला दोन दिवसांचा अल्टिमेटम

### तर देशाला काळजी लावणारी घटना-थोरात

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी बीडमधील मस्साजोग गावचे मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. थोरात म्हणाले, संतोष देशमुख यांना ज्या प्रकारे निर्घृणपणे मारण्यात आले आहे, हा प्रकार माणुसकीला काळीमा फासणारा आहे. महाराष्ट्र नाही, तर देशाला काळजी लावणारी ही घटना आहे. बीडमध्ये जिल्ह्यात राजकीय हस्तक्षेपांचा अतिरेक झाला आहे. बीडमध्ये २८ तारखेला निघत असलेल्या मोर्चात सर्वांनी सामील व्हावे, असे आवाहन थोरात यांनी केले.

**बीड,/प्रतिनिधी**

बीड दि.२५ (बातमीदार): बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची मराठा क्रांती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली. यानंतर भेटीनंतर मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी चांगलेच आक्रमक झाले. वाल्मिक कराड हा सरकारपेक्षा मोठा आहे का? असा सवाल करत, गुन्ह्यातील मास्टरमाईंडला अटक करण्यासाठी दोन दिवसांचा अल्टीमेटम दिला. तसेच बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीला लगाम घालायचा असेल, तर एकट्या पोलिस अधीक्षकांची बदली करून काही होणार नाही. बीड जिल्ह्यातील संपूर्ण पोलिस दलातील अधिकाऱ्यांच्या बदल्याची मागणीही मराठी क्रांती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी केली. मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली असून, त्यांच्या

### बीड जिल्ह्यातील संपूर्ण पोलिस दल बदलण्याची मागणी

कुटुंबियांच्या न्यायाच्या लढाईत ते एकटे नाही, असा इशारा मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक आबा पाटील यांनी दिला. महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातील मराठा समाज देशमुख कुटुंबियांच्या मागे उभा आहे, असेही आबा पाटील यांनी सांगितले. तसेच बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीला एका पोलिस अधीक्षकांच्या बदलीने आळा बसणार नाही. हे मोठं जाळ आहे. ते उध्वस्त करायचे असेल, तर बीड पोलिस दलातील सर्व अधिकाऱ्यांची बदली एका महिन्यात जिल्ह्याबाहेर करा, अशी मोठी मागणी मराठी क्रांती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी केली. दोन दिवसात सर्व आरोपी अटक करा. महाराष्ट्र शांत ठेवायचा असेल, बीड जिल्हा शांत ठेवायचे असेल, तर सरकारला दोन दिवसाचा अल्टिमेटम आहे असा इशारा मराठी क्रांती मोर्चाच समन्वयक आबा पाटील यांनी दिला. तसेच देशात कायदा मोठा आहे. इथं पंतप्रधानांना देखील अटक झाली होती. मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांना देखील अटक झाली होती. या घटनेत दोन दिवसात गुन्हेगारांना अटक न झाल्यास आम्ही रस्त्यावर उतरू, असा इशारा देण्यात आला

# बीडच्या सोहम लांगोरे व श्रेयस शिंदे याचे बुद्धिबळ स्पर्धेत नेत्रदीपक यश



बीड ; पाथर्डी येथे संपन्न झालेल्या दोन दिवशीय खुल्या राज्यस्तरीय स्पर्धेत बीडचा चि.सोहम अतुल लांगोरे याने १५ वर्षाखालील वयोगटामध्ये ७ पैकी ६.५ गुण घेत ७ पैकी ६ सामने जिंकून एका सामन्यात बरोबरी करत अपराजित राहून दुसरा क्रमांक पटकावला.तसेच बीड येथील चि.श्रेयस अनिल शिंदे याने देखील १२ वर्षे वयोगटाच्या आतील स्पर्धेत पाचवा क्रमांक मिळवत यश संपादन केले. आनंद चेस क्लब आयोजित खुल्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा दि. २१ ते २२ डिसेंबर यादरम्यान झालेल्या प्रतिवार्षिक व तीस वर्षाच्या अखंडित असलेल्या स्पर्धेचे कुशल मार्गदर्शक डॉ.विनय कुचेरिया हे करत आहेत यामध्ये एकूण १६८ खेळाडूंनी सहभाग घेतला होता ज्यात २८ आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त खेळाडू खेळत होते. या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. बुद्धिबळ प्रशिक्षक श्री.दत्तात्रेय क्षीरसागर व श्री. रामप्रसाद शेंडगे यांचे त्यांना विशेष मार्गदर्शन लाभले.बीड शहरातील प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. विजय मोहनराव कट्टे यांच्या हस्ते यशस्वी खेळाडूंचा काल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सोहम अतुल लांगोरे, श्रेयस अनिल शिंदे,अभिनव नितीन राऊत, आदित्य बाळू घुगे, विश्व संजय होळकर व कु.वेदा विजय कट्टे हे विद्यार्थी व प्रशिक्षक उपस्थित होते.

## के.एस.पी विद्यालय येथील विद्यार्थ्यांची मोरदरा व पंचायत समिती बीड येथे क्षेत्रभेट उत्साहात संपन्न



बीड प्रतिनिधी : शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामधील इयत्ता ३ री ते ६ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोरदरा येथील पर्यटन स्थळी घेऊन जाण्यात आले. विद्यार्थ्यांना परिसर अभ्यासचे ज्ञान प्रत्यक्षात व्हावे या उद्देशाने मुलांना बीड येथील पालीच्या घाटामध्ये असलेल्या मोरदरा हे पर्यटन स्थळी घेऊन जाण्यात आले. त्या ठिकाणी श्री महादेव मंदीर, डोंगर, विविध वस्तपती, प्राणी, पक्षी, गोशाळा, या बदल प्रत्यक्ष पहाणी करुन माहीती देण्यात आली. मुलांनी वन भोजन करुन क्षेत्रभेटीचा खुप आनंद घेतला. तसेच दि.२३.१२.२०२४ रोजी इयत्ता ७ वी ते ८ वी मधील मुलांना नागरिकशास्त्र विषयातील विविध संकल्पना आणखी सोप्या व्हावेत या हेतुने मुलांना बीड येथील पंचायत समिती बीड येथे मुलांना प्रत्येक्षात कृषि विभाग, लेखा विभाग, पाणी पुरवठा विभाग, शिक्षण विभाग, अशा सर्व विभागाची माहीती देण्यात आली. यावेळी पंचायत समितीतील गटविकास अधिकारी श्री. अनुरुद्र सानप सर, गट शिक्षणाधिकारी श्री भगवान सोनवने सर, माटे सर यांनी पंचायत समितील सर्व कामकाजाविषयी मुलांना खुप मोलाचे मार्गदर्शक केले. सर्व मुले खुप आनंदी होती. या क्षेत्रभेटीस श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी यांनी दोन्ही क्षेत्रभेटी उत्साहात संपन्न केल्या

## भुजबळ अजितदादां सोबत राहतील असे वाटत नाही -ना. अंबादास दानवे

मुंबई दि.२५ (वृत्तसेवा): मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने नाराज असलेले अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ ओबीसी समाजातील संघटना, आघाड्या, संस्था यांच्या सभा, बैठका घेत आहेत. एकीकडे छगन भुजबळ सातत्याने अजित पवार यांच्यावर टीका करताना तीव्र नाराजी बोलून दाखवत आहेत, तर दुसरीकडे छगन भुजबळ मोर्चेबांधणी करताना पाहायला मिळत आहेत. याचाच एक भाग म्हणून छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सागर बंगल्यावर जाऊन भेट घेतली. छगन भुजबळ यांच्या नाराजीवरून राजकीय वर्तुळातूनही प्रतिक्रिया येत असून, ठाकरे गटाच्या नेत्यांनी मोठा दावा केला आहे. मंत्रिमंडळात भाजपाच्या वाट्याचे एक मंत्रीपद रिक्त आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीतील नाराज आमदार लक्ष ठेवून आहेत. भाजपामधील कोणाची यावर वर्णी लागणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. यातच नाराज असलेले छगन भुजबळ मंत्रिपदासाठी भाजपामध्ये प्रवेश करू शकतात, अशी चर्चाही राजकीय वर्तुळात आहे. यातच ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी छगन भुजबळ यांच्या नाराजीप्रकरणी मोठा दावा केला आहे. काहीही होऊ शकते. ज्या पद्धतीने छगन भुजबळ व्यक्त होत आहेत, ते पाहता अजित पवार यांच्यासोबत राहतील, असे वाटत नाही. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि छगन भुजबळ यांची भेट होत नाही. पण, छगन भुजबळ आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट मात्र होते. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया जे बोलल्या आहेत, ते बरोबर आहे, असा दावा अंबादास दानवे यांनी केला. दरम्यान, बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख प्रकरणावर अंबादास दानवे यांनी सरकारवर टीका केली. बीड प्रकरणात आरोपी सरकाला सापडत नाही. सरकार गंभीर पावले उचलत नाही. आरोपी आणि पोलीस यांचे व्हिडिओ समोर आले होते. बीड जिल्ह्यातील परिस्थिती गंभीर आहे, असे दानवे म्हणाले.

## बीडमध्ये कोणाचीही दादागिरी चालू देणार नाही



काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. त्यावरून मोठ्या प्रमाणावर राजकारण तापलं आहे. त्यानंतर आता बीडमधील गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. या प्रकरणाची चौकशी आणि संपूर्ण तपास सुरू असतानाच फडणवीसांनी आज नागपुरात बोलताना मोठं वक्तव्य केलं आहे. बीडमध्ये आम्ही कोणाचीही दादागिरी चालू देणार नाही, असं म्हणत त्यांनी थेट इशारा दिला आहे. बीड जिल्ह्याची तुलना ही बिहारसोबत केली जात आहे, तिथे घडत असलेल्या गुन्ह्यांवरून विरोधक मोठ्या टीका करताना दिसत आहेत, याबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, घटना जेव्हा घडतात तेव्हा अशा प्रकारच्या चर्चा होतात. याचा अर्थ बीड जिल्ह्याला आपण इतकही बदनाम करू नये. मात्र हे खरं आहे, गेल्या काही दिवसात तिथे घडलेल्या घटना या गंभीर स्वरूपाच्या आहेत आणि आम्ही त्या गंभीरतेने घेतलेले आहेत, अशा प्रकारच्या गुन्हेगारांवर जरब बसवल्याशिवाय आम्ही थांबणार नाही. मी कालही सांगितलं, आजही सांगतो. बीड जिल्ह्यामध्ये कोणाचीही दादागिरी चालू देणार नाही, असं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

# पंतप्रधान आवास योजनेतून महाराष्ट्रात होणार २० लाख घरे

### अतिरिक्त १३ लाख घर आपल्याला देण्यात आलेली आहे.

पुणे : पंतप्रधान आवास योजनेबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान आवास योजनेत महाराष्ट्रातील बेघरांसाठी ६ लाख ३६ हजार ८९ घरे उपलब्ध करून दिली आहेत. राज्यातील ग्रामीण भागातील गरिबांसाठी मोठी घोषणा केली आहे. यामधील काही निकषांमुळे गरिबांना घरे मिळत नव्हती. त्यामुळे पात्रतेचे निकष शिथिल केले असून, योजनेत यंदा महाराष्ट्रासाठी १३ लाख २९ हजार ६७८ घरे अशी एकूण सुमारे २० लाख घरे उपलब्ध करून दिली जाणार आहेत, अशी घोषणा केंद्रीय कृषी व ग्रामविकासमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली. किसान सन्मान दिवस २०२४ निमित्ताने पुण्यातील कृषी तंत्रज्ञान अनुप्रयोग तंत्रज्ञान संस्थेतर्फे शेतकरी सन्मान दिनानिमित्त आयोजित संमेलनात ते बोलत होते. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, संस्थेचे संचालक एस. के. रॉय उपस्थित होते. यावर्षी आपल्याला प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारने साडेसहा लाख घरं मंजूर केली होती, ते टार्गेट वाढवण्यात आलं आहे. अतिरिक्त १३ लाख घर आपल्याला देण्यात आलेली आहे. एकूण आपण विचार केला तर जवळपास यावर्षी केंद्र सरकारच्या वतीने महाराष्ट्रातल्या गरिबांकरता, कच्च्या घरात राहणाऱ्यांकरता बेघरांकरता एका वर्षात २० लाख घर देण्याची घोषणा आत्ताच केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी केलेली आहे महाराष्ट्राला मोदी सरकारने दिलेली ही अत्यंत मोठी भेट आहे, कोणत्याही राज्याला आत्तापर्यंत इतक्या संख्येने घरे मिळालेली नाही, जवळपास २० लाख घरे आपल्याला मिळालेली आहेत. योजनेचे निकष आता बदलण्यात आले असून, पूर्वी फोन व दुचाकी असलेल्यांना घरे मिळत नव्हती. आता अशांनाही घरे मिळणार आहेत. ज्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न १० हजार असायचे, यांचाही योजनेत समावेश केला जात नव्हता. आता ही मर्यादा १५ हजार रुपये प्रतिमहिना केली आहे. पाच एकर कोरडवाहू व अडीच एकर बागायती शेती असलेल्या शेतकऱ्यांनाही ही योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं चौहान यांनी सांगितले. पुढील ५ वर्षांमध्ये सर्व बेघरांना घरे देण्याचा निर्णय पंतप्रधान मोदींनी घेतला आहे. इतक्या संख्येने राज्याला घरे देण्याच्या निर्णयावर फडणवीसांनी मोदींचे आणि चौहान यांचे आभार मानले आहेत.



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com